४.४०
२१-९-२०२३

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २१/०९/२०२३

### प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

इंडियन स्वच्छता लीग 2.0 अंतर्गत "सफाई मित्र यांच्याकरिता सेवा व सुरक्षा शिबिर उल्हासनगर दि.21 सप्टेंबर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने महानगरपालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर गोल मैदान येथील मिडटाऊन हॉल येथे प्रभाग समिती १ व २ करता आयोजित करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन मा. आयुक्त अजिज शेख यांच्या हस्ते झाले. यावेळी मा. अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, आरोग्य विभाग प्रमुख मनीष हिवरे, मुख्य स्वच्छता निरीक्षक एकनाथ पवार व विनोद केणे व वैद्यकीय पथकातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त अजिज शेख यांनी 'कर्मचारी स्वस्थ तर शहर स्वस्थ' राहील यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय तपासणी करून घ्यावी व या तपासणीमध्ये काही गंभीर आजार असल्याचे निदान झाल्यास महापालिका अशा कर्मचाऱ्यांवर मोफत वैद्यकीय उपचार करेल असे जाहीर केले.

वैयक्तिक स्वास्थ्याबद्दल काय काळजी घेतली पाहिजे यासाठी या शिबिरात तज्ञांनी मार्गदर्शन केले. स्वच्छ व सुंदर शहर करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आरोग्यदायी राहावे यासाठी अशी शिबिरे नियमित आयोजित केली जातील असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी केले.

सफाई कर्मचाऱ्यांना सुद्धा सन्मानाने जगता यावे, त्यांच्या मुलांना सुद्धा शैक्षनिक सुविधांचा लाभ मिळावा म्हणून इतर सरकारी सुविधांची माहिती देण्याकरता दोन दिवसीय शिबीर बँकेतर्फे व राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभाग तर्फे दि, २५ व २६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे.

21/9/23

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.